# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर,

# जि. सोलापूर – ४१३३०४

(महाराष्ट्र शासन स्थापित)

## ॥ रामकृष्णहरी ॥

जाहिर दरपत्रक – २०२५ – २६

कामाचे नांव : श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांत भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास व परिसरातील ढेकूण, झुरळे, पाल, पिसा, मुंगी, उंदीर, घुस, सर्प तसेच वाळवीचे संपूर्ण समुळ नायनाट करणे कामीच्या उपायोजना व इतर किटकांचा त्रास होऊ नये म्हणून किटकनाशक औषधे फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेचे काम

| अ..क्र | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल कामाचा कालावधी | ०१ वर्ष |
| २ | वार्षिक अंदाजे खर्च | ६,००,०००/- |
| ३ | सुरक्षा अनामत रक्कम | ०४% |

दरपत्रक मंदिरे समितीच्या vitthalrukminimandir.org या पहावयास  संकेतस्थळावर मिळेल.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि. सोलापूर – ४१३३०४

भक्तनिवास विभाग/का.वि./      /२०२५

**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे भक्त निवास विभागासाठी पेस्ट कंट्रोल कामाचे दरपत्रक सिलबंद लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.**

**श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांत भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमधील खोल्या, गॅलरी, स्टोअर (भुभाग, छत, भिंती, ड्रेनेज, गटार व चेंबर्स) त्यातील फर्निचर, संडास, बाथरूम, स्नानगृह, गाद्या, कॉट, बेड व इ. मध्ये भक्तांना ढेकूण, झुरळे, पाल, पिसा, मुंगी, उंदीर, घुस, सर्प तसेच वाळवीचे संपूर्ण समुळ नायनाट करणे कामीच्या उपायोजना व इतर किटकांचा त्रास होऊ नये म्हणून किटकनाशक औषधे फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेकामी निविदा मागविण्यात येत आहेत या संबंधिच्या सुचना अटी व शर्ती खालील प्रमाणे.**

1. सदर पेस्ट कंट्रोल कामाच्या माहितीचे बुकलेट कार्यालयीन वेळेत श्री संत तुकाराम भवन येथील नोटीस बोर्डावर लावण्यात आलेले आहे. तसेच मंदिरे समितीच्या vitthalrukminimandir.org या पहावयास संकेतस्थळावर मिळेल. दरपत्रक फॉर्म व त्यासोबतचे सर्व कागदपत्रे लिफाफ्यात सिलबंद करून दि. २७/०६/२०२५ सांय ०५:०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाफ्यावर ठेकेदाराचे नांव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक पेस्ट कंट्रोल करणेकामी भरलेले आहे, असा सविस्तर तपशील नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उषीरा आलेले दरपत्रक विचार घेतले जाणार नाहीत.
2. पेस्ट कंट्रोल कामी निविदा सिलबंद लिफाफ्यात भरावयाची आहे.
3. पुर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकावर आहे.अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
4. ज्यांची निविदा मान्य होईल त्या निविदाधारकास निविदा स्विकृती पत्र मिळाले पासून ०८ दिवसात करारनामा करून द्यावा लागेल व कामाची हमी म्हणून कार्यादेशाच्या मंजुर रकमेवर ०४ टक्के प्रमाणे होणारी रक्कम समितीकडे सुरक्षा अनामत म्हणून बिनव्याजी ठेवावी लागेल. सदरची रक्कम कामाची वर्क आर्डर मिळाले नंतर ०८ दिवसाचे आत समितीकडे जमा करणे व रक्कम रू ६००/– स्टॅंपपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
5. औषध फवारणी केलेनंतर  औषधाचा प्रभाव ६० दिवस असणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाची तपासणी महिन्यातून ०१ वेळा करणे आवश्यक आहे.
6. औषध फवारणी करतांना औषधांचा प्रभाव ढेकूण,झुरळे,पाल,पिसा,मुंगी,उंदीर,घुस,सर्प तसेच वाळवीचे संपूर्ण समुळ नायनाट करणे व इतर किटकांवर होणे आवश्यक आहे.
7. कमी जास्त दराची कोणतीही निविदा स्वीकारण्याचा नाकारण्याचा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिरे समितीकडे बंधनकारक राहणार नाही.
8. पेस्ट कंट्रोल करण्याचा कालावधी श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या तिनही इमारतीमध्ये एक वर्षाचा राहील. (दि. ०१/०८/२०२५  ते दि. ३१/०७/२०२६)

9. निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.
10. निविदाधारकाने निविदा सादर करतांना सर्व कर वगळून अंतिम दर देणे बंधनकारक आहे.
11. निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम केले नाही त्यामुळे इतरांकडून करून घेण्यात आलेल्या कामापोटी मंदिरे समितीचे झालेले नुकसान निविदाधारकास द्यावे लागेल. त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाला ५००/– रुपये प्रमाणे वाढीव नुकसान मंदिरे समितीचे द्यावयाचे आहे. दंडाची रक्कम निविदाधारकाच्या सुरक्षा ठेवीमधुन कपात करण्यात येईल.
12. निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधनकारक काम करत नसेल तर अथवा पेस्ट कंट्रोलचा काहीच परिणाम होत नाही असे आढळून आल्यास, मंदिरे समितीस कोणतीही पुर्व सुचना न देता करार रद्द करेल व निविदाधारक यांची सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येवून ०१ वर्षासाठी मंदिरे समितीच्या काळ्या यादीत नांव टाकण्यात येईल.
13. न्युनतम दरानुसार मंजुर झालेल्या कामाबाबतचा कार्यादेश देण्यात येईल, त्यानुसार काम करावे लागेल. दिलेले काम वेळेत न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
14. निविदाधारकांने निविदा सादर करतांना काही माहिती अपुरी ठेवल्यास/राहिल्यास त्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील अंतिम निर्णय मा. कार्यकारी अधिकारी यांचेसाठी राखीव असेल.
15. नमुद केलेल्या इमारतीमध्ये एक वर्ष कालावधी करीता पेस्ट कंट्रोल करणे आहे. पेस्ट कंट्रोल व्यवस्थीत झाले नाही असे आढळून आल्यास निविदाधारकास स्वखर्चाने पुनश्च तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करून दयावी लागेल. त्यासाठी वेगळी रक्कम अदा केली जाणार नाही.
16. निविदाधारकास पेस्ट कंट्रोल करण्यापुर्वी संबंधित विभागाकडून कळविण्यात येईल. त्यानुसार खोल्या व परिसरामध्ये औषध फवारणी करून द्यावी लागेल.
17. औषध फवारणीसाठी लागणारे कामगार, औषध, पंप, साहित्य वगैरे निविदाधारकाने स्वखर्चाने पुरवावयाचे आहेत.
18. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे जाणे/येण्याचा खर्च तसेच चहा/पाणी/जेवण/नाश्टा/ राहण्याची वगैरे खर्चही निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.
19. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची विषबाधा अगर इतर कारणास्तव काही त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. मंदिरे समितीवर कुठल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.
20. पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे वेतन/भविष्य निर्वाहनिधी/व्यवसायकर/आयकर/सेवाकर व ऐनवेळी उद्रभवणाऱ्या इतर सर्व कायदेषीर बाबींची जबाबदारी निविदाधारकांवर राहिल. त्यास कोणत्याही प्रकारे मंदिरे समिती जबाबदार राहणार नाही.
21. निविदाधारकाची निविदा मंजुर झालेनंतर त्यांनी सदर कामासाठी घेतलेल्या कामगारांचे भविष्य निर्वाह निधी अंशदान कामगार कल्याण निधी, इ. एस.आय.सी. कॉंट्रीब्युशन, गृप इन्शुरन्स, वर्क मेन कॉम्पेसेशन, पॉलीसी, व्यवसाय कर, टी.डी.एस. सानुग्रह अनुदान, पगारी आठवडा सुट्टी, जी.एस.टी. कामगार कायद्यानुसार वेतन स्लिप व इतर आर्थिक देणी देणेबाबतची संपुर्ण कायदेषीर जबाबदारी निविदाधारकावर

बंधनकारक राहील मंदिरे समिती त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोशिस व झळ मंदिरे समितीला लागणार नाही हे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

22. निविदाधारकास प्रत्येक औषध फरवाणीचे वेळी अधिकारी सांगतील त्या विभाग प्रमुख/कर्मचारी यांचे समक्ष औषध फवारणी करून दयावी लागेल.
23. पेस्ट कंट्रोल करणेकामी देण्यात आलेल्या चै.फु.दरामध्ये खोल्या, छत, भुभाग, चार भिंती त्यातील फर्निचर, संडास बाथरूम, गाद्या, कॉट, क्लोकरूम, हॉल, गॅलरी, साईड गटार, चेंबर्स इ. चा समावेश राहील. बिल हे चटाई क्षेत्राचे मोजमापा प्रमाणे अदा केले जाईल.
24. कार्यदिशात इमारती व्यतिरीक्त पेस्ट कंट्रोल करावयाच्या इमारतीमध्ये वाढ झाल्यास, वाढीव इमारतीचे आकारमानानुसार प्रति चौरस फुटास मंजुर दराने व त्याच दराने वाढीव इमारतीमध्ये या करार कालावधीत पेस्ट कंट्रोल करून देणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. त्यासाठीचे अटी व शर्ती आहे त्याच राहतील ज्या वाढीव इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करावयाचे आहे त्या बाबत निविदाधारकास स्वतंत्र पत्र देऊन कळविण्यात येईल.
25. एक वर्षाने कालावधीमध्ये प्रति दोन महिन्यानंतर एक फवारणी अशा कमीतकमी सहा फवारण्या करणे आवश्यक आहे. अशा केलेल्या प्रत्येक फवारणी नंतर एकुण मंजुर रक्कमेच्या १० टक्के एवढे किंवा झालेल्या कामाचे मंजुर दराने होणाऱ्या रक्कमे इतके बिल निविदाधारकाने संबंधित विभागाकडे सादर करावे. शिल्लक राहणारी रक्कम मुदती अखेर (कामाचे पुर्ततेनंतर) बीनव्याजी अदा केली जाईल.
26. एक वर्ष करार कालावधीत कोणत्याही कारणांसाठी अथवा सबबीवर निविदाधारकास दरवाढ मिळणार नाही. निश्चित केलेल्या दरानेच पेस्ट कंट्रोल काम करावे लागेल.
27. नियुक्त केलेल्या कामगाराचे संबंधित कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲण्ड ॲबॅलिशन) ॲक्ट 1970 नुसार हजेरी रजिस्टर वेतन पत्रके, वगैरे अनुशंगिक कागदपत्रे विहित नमुन्यात ठेवणे तसेच सदरच्या कायद्यानुसार त्यांची पुर्तता करणे ही संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.
28. निविदाधारकांकडून नियुक्त केलेल्या कामगारानी भाविक भक्तांशी, नागरिकाशी, मंदिरे समितीचे अधिकारी/कर्मचारी यांच्याशी गैरवर्तन करणार नाही. यांची काळजी निविदाधारकांने घ्यावयाची आहे.
29. निविदाधारकांस इमारतीच्या सभोवतालच्या परिसरात ड्रेनेज/चेंबर्स या ठिकाणी औषध फवारणी करावी लागेल.
30. निविदाधारकास पेस्ट कंट्रोल करतांना मधमाश्यांचे मोहोळ आढळून आल्यास ते काढावे लागेल.
31. कर्मचाऱ्यांना आपले कंपनीचे गणवेष व सुरक्षते बाबतचे साहित्य दयावे लागतील.
32. पेस्ट कंट्रोल करणेकामी Central Insecticide Boards ने approve केलेले (house hold) (Aimco Pesticided Ltd, Bayer Crop Science Ltd, Bharat Rasayan Ltd Aimco Pesticided Ltd, Bayer Crop Science Ltd, Bharat Rasayan Ltd) औषध वापरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.
33. निविदाधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे नियमानुसार योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करून दयावे लागेल व त्यास येणारा खर्च निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.

34. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास निविदाधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम मंदिरे समितीकडे जमा राहील. मंदिरे समितीचे झालेली नुकसानीची, नुकसान भरपाई निविदाधारकांकडून वसुल करण्यात येईल.
35. उपरोक्त अटी व शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी व शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी व शर्ती विहित करणे याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.
36. निविदा सादर करण्यापुर्वी ज्या निविदाधारकांना कामाची माहिती घ्यावयाची असेल अशा निविदाधारकांनी निविदा टेंडर सादर करण्यापुर्वी मंदिरे समिती चे श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमध्ये समक्ष जाऊन/कामाची पाहणी व सखोल अभ्यास करून माहिती घेवून सर्व कर वगळून अंतिम दर दयावेत.
37. निविदाधारकांने निविदा सादर करताना फक्त मुळ रक्कम नमुद करावी. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणाऱ्या दरानुसार GST रक्कम मंदिरे समितीचे मार्फत देण्यात येईल. सदर GST ची रक्कम विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच शासनाकडे GST भरणा केलेबाबतचे चलन व बिल निहाय गोषवारा तसेच फवारणी नंबर बिला सोबत मंदिरे समितीकडे सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.
38. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल.
39. कोणतेही कारण न देता निविदेच्या कोणत्याही टप्यावर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवला आहे.
40. पेस्ट कंट्रोल केल्यानंतर भाविकांना व भक्तनिवास मधील अधिकारी, कर्मचारी व कामगारांना कोणत्याही प्रकारचा त्रास उदा. विष बाधा, मळमळने उलटी होणे व वास येणे इ. होता कामा नये अशा प्रकारचा त्रास झाल्यास याची सर्व जबाबदारी निविदाधारकाची राहील.
41. या कान्ट्रॅक्टबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो क्षेत्र पंढरपूर या कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.
42. निविदाधारकास खालील निवास स्थानांमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करावयाचे आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | इमारतीचे नाव | खोल्यांची संख्या | एकुण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) |
|---|---|---|---|
| १ | श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास | २९७ | ९३६३३ चौरस फुट |
| २ | वेदांत भक्तनिवास | ३० | ९६०८ चौरस फुट |
| ३ | व्हिडिओकॉन भक्तनिवास | ३४ | ११०८२ चौरस फुट |
| | एकुण | | ११४३२३ चौरस फुट |

43. दरपत्रका सोबत सादर करावयाची आवष्यक कागदपत्रांची यादी खालील प्रमाणे आहे. सदरचे सर्व कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा. या आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रृटी असल्यास किंवा कागदपत्रे सादर न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

| अ.क्र | आवश्यक कागदपत्रांची यादी |
|---|---|
| १ | परिशिष्ट – १ प्रमाणे पेस्ट कंट्रोल कामाचा तपशील. |
| २ | परिशिष्ट – २ प्रमाणे निविदाधारकाची माहिती. |
| ३ | परिशिष्ट – ३ प्रमाणे प्रतिज्ञापत्र |
| ४ | आय.एस.ओ. (ISO) मानांकन प्रमाणपत्र Licensing Authority चे प्रमाणपत्र |
| ५ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला |
| ६ | पॅन कार्ड |
| ७ | आधार कार्ड |
| ८ | जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र |
| ९ | शासकीय/निमशासकीय/पंचतारांकिंत हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेश. |
| १० | पेस्ट कंट्रोल कामाचा ०३ वर्षांचा अनुभव असावा व त्यासंदर्भतील आवश्यक पुरावे. |
| ११ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटर ट्रेनिंगचे प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| a) | Central Food Technological Resarch Institute अथवा |
| b) | Technical Training For PMP s अथवा |
| c) | storage pest Management & Fumigation |
| | (भारतीय अनाज संचयन संस्थान चे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र) अथवा |
| d) | The pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र |
| १२ | आपल्या फर्मचे नांव ब्लॅक लिस्टेड नसले/असेल बाबतचे हमीपत्र लेटर हेडवर सही शिक्क्यानिशी सादर करावे. (Self Declaration) |

परिशिष्ट क्रमांक १

पेस्ट कंट्रोल निविदा तक्ता (किटकनाशक औषध फवारणी)

कालावधी २०२५ – २०२६

दिनांक ०१/०८/२०२५ ते दिनांक ३१/०७/२०२६

निविदाधारकाने श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीमध्ये खोल्या/स्टोअर (भुभाग, छत व भिंती) त्यातील फर्निचर, संडास, बाथरूम, गादया, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकूण,झुरळे,पाल,पिसा,मुंगी,उंदीर,घुस,सर्प तसेच वाळवीचा समुळ नायनाट करणे व इ. किटकांचा त्रास होऊ नये म्हणून पेस्ट कंट्रोल करणेकामी एक वर्षाकरीता (०६ फवारण्या) प्रति चैरस फुटाचा दर दयावा. इमारतींचे डक्ट, ड्रेनेज, गॅलरी, पॅसेज इत्यादीचा समावेष त्यात राहील.

| अ.क्र. | तपशिल | भक्तनिवासातील एकुण क्षेत्रफळ | जनरल पेस्ट कंट्रोल एकुण फवारणीचा दर सर्व करासह (सहा फवारणी) रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास<br>खोल्या–२९७<br>९३६३३ चौ.फुट | १,१४,३२३<br>चौ.फुट | |
| २ | वेदांत भक्तनिवास<br>खोल्या–३०<br>९६०८ चौ.फुट | | |
| ३ | व्हिडिओकॉन भक्तनिवास<br>खोल्या–३४<br>११०८२ चौ.फुट | | |
| ४ | भक्तनिवास येथील ३६१ खोल्यांमधील कपाटे, दरवाजे,चौकटी व इमारतीमधील सर्व लाकडी साहित्यास वाळवीचा समुळ नायनाट करणेकामी ड्रीलींग करून ऑईलबेस स्प्रे करून केमीकल भरणे. (वर्षातुन एक वेळा) | (वर्षातुन एक वेळा) | |

Note :- Rate Of GST as applicable by Govt. time to time

निविदाधारकाचे पुर्ण नांव –

निविदाधारकाची स्वाक्षरी

शिक्का व संपुर्ण पत्ता –

मोबाईल नंबर –

परिशिष्ट क्रमांक २

**निविदाधारकाची माहिती**

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | फर्मचे नांव | |
| | पत्र व्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| | दुरध्वनी क्रमांक | |
| | ई मेल | |
| | व्हॉट्सऍप क्रमांक | |
| | निविदेसंबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तिचे नाव | |
| | मोबाईल क्रमांक | |
| | बॅंक तपशील ( रद्द केलेल्या धनादेशाची छायांकीत प्रत सोबत जोडावी) | |

निविदाधारकाची सही

परिशिष्ट क्रमांक ३

**प्रतिज्ञापत्र**

मा. कार्यकारी अधिकारी

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

पंढरपूर, जि. सोलापूर. ४१३३०४

**विषय:– पेस्ट कंट्रोल करणे.**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेले दरपत्रक/निविदा वाचली आपल्या दरपत्रक निविदेत नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी व शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेले मंदिरे समितीचे श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवास या इमारतीच्या खोल्या/स्टोअर किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) करावयाचे आहे. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य/मशीनरी व उच्चतम दर्जाचे औषधे स्वतःच्या खर्चाने वापरावयाचे आहे. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारणेची हमी देतो. त्यासाठी लागणाऱ्या मशीनरी व कामगार यांची राहण्याची/जेवणा/चहापानाची व्यवस्था मी/आम्ही आमचे खर्चाने करू, कामगारांचे वेतन/भविश्यनिर्वाह निधी/व्यवसाय कर/सेवाकर/आयकर वगैरे सर्व कायदेशीर जबाबदारी व त्याबाबत लागणाऱ्या पुर्ततेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर/आम्हावर राहील, याची हमी देते आहे/आहोत.

सदर पत्राद्वारे हमी देतो की, आम्हाला/आमच्या मंदिरे समिती पेस्ट कंट्रोल कामी कुठल्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्थान अथवा खाजगी संस्थान यांनी काळ्या यादीत (black listed) समाविष्ट नाही. सदर माहिती खरी व बरोबर असून ती चुकीची आढळल्यास आमची निविदा रद्द होणेस पात्र राहील.

निविदा फि व बयाणा रक्कम भरलेची पावती सोबत जोडत आहोत.

माझी/आमची निविदा मंजुर झाल्यास सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करून देणेस तयार आहे/आहोत त्यास नियमानुसार येणारा खर्च मी करेल/आम्ही करू उपरोक्त कामाची हमी म्हणून मंजुर झालेल्या रकमेच्या ४ टक्के इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रोख/RTGS/NEFT ने द्वारे भरणा करू, निविदेतील मंजुर दराने काम करून देणे/आम्हावर बंधनकारक राहील.

निविदाधारकाची सही

आपला/आपले विश्वासु

निविदाधारकाचे नांव ------------------

शिक्का

संपुर्ण पत्ता ------------------

फोन/मोबाईल नंबर ------------------